भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र.३३६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १८/०५/२०१७

**१) डोंगरी माईन्स नार्थडंम्प मधुन मॅग्नीज अवैधरित्या उत्खनन करून चोरी करून वाहतुक करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १६/०५/२०१७ चे २१.०० वा. दरम्यान यातील आरोपीतांनी आपले ताब्यातील छोटा हत्ती वाहनाने डोंगरी माईन्स नार्थडंम्प मधुन अंदाजे ५ ते ६ टन किंमती ६०००/रू. चा मॅग्नीज अवैधरित्या उत्खनन करून चोरीने वाहतुक करतांनी मिळुन आल्याने फिर्यादी साहेबराव लक्ष्मन इंगोले वय ५८ वर्ष रा. डोंगरी माईन्स यांचे लेखी रिपोर्ट वरून पोस्टे. गोबरवाही येथे कलम ३७९ भांदवि. सहकलम ४८(७)(८) महा.जमिन महसुल अधिनीयम १९६६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. लिल्हारे पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) संगनमत करून राशन दुकानात डि.एस.ओ. अधिकारी असल्याचे सांगुन गल्यातील पैसे काढुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १७/०५/२०१७ चे ०९.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी गोपीचंद श्रीपत गायकवाड वय ५१ वर्ष रा. बघेडा हे आपले सरकारी राशन दुकानात हजर असतांना आरोपीतांनी भंडारा येथिल डि.एस.ओ. अधिकारी असल्याची बतावनी केली व फिर्यादीला लक्षात आल्याने त्यांनी जिवानीशी मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी हा घाबरून दुकानाचे गल्यातुन त्यांना २०००/रू. काढुन दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोस्टे. गोबरवाही येथे कलम ४१९,३८६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. मोदनकर पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) क्षुल्लक कारणावरून शिवीगाळ करून पाणी पिण्याच्या लोटयाने चेहऱ्यावर मारून जखमी करून जिवाने मारपिटण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १५/०५/२०१७ ते १९.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी व आरोपी हे पती पत्नी असुन पती हा दारू पिण्याचा व मारहान करण्याचा सवईचा असुन फिर्यादी ही आपले घरी हजर असतांना आरोपी पतीने आपल्या मित्राला दारू पिण्याकरिता पाणी आणायला घरी पाठविले असता तु माझ्या मित्राला उलट सुलट का बोलली म्हणुन शिवीगाळ करून पाणी पिण्याच्या लोटयाने चेहऱ्यावर मारल्याने लोटयाची धार दोन्ही डोळयाचे खाली नाकाला लागुन रक्त निघाले व डोक्याचे केस पकडुन मारहान करून जिवाने मारण्यापिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादी सौ. आशा रूपेश सुर्यवंशी वय ३३ वर्ष रा. सावरला हिचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे. पवनी येथे कलम ३२४,५०४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. पटले पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

४) मोटार सायकल स्लिप झाल्याने डोक्याला मार लागुन गंभिर जखमी झाल्याने उपचारा दरम्यान मरण पावल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक ८/०५/२०१७ ते १०.०० वा. दरम्यान यातील आरोपी हा मोटार सायकलने जात असता त्याचे ताब्यातील मोटार सायकल स्लिप झाल्याने त्याचे डोक्याला मार लागुन गंभिर जखमी झाल्याने आरोपी मृतक यास उपचारा करिता उपजिल्हा रूग्नालय साकोली येथे नेवुन प्रथम उपचार करून डॉ. ने रेफर केल्याने त्यास सा. रू. भंडारा येथे नेवुन उपचार करून पुढील उपचारा करिता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पो.स्टे. अजनी नागपुर येथे मर्ग क्र.००/२०१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. मडावी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. साकोली येथे कलम २७९,३०४,(अ) भांदवि. अन्वये नंबरी गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मेश्राम पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

५) मारोती चालकाच्या निष्काळजीपणामुळे सायकल चालकाला मागेहुन धडक देवुन दोन ईसमास जखमी केल्याने गुन्हा नोदं . :–

दिनांक १७/०५/२०१७ चे १२.०५ वा. दरम्यान यातील जखमी फिर्यादी अमन चेतराम दिघोरे वय २१ वर्ष रा. बोदरा हा सायकलने डब्बलसिट बसुन गडेगाव आयटीआय वरून बॅक ऑफ इंडीया लाखनी कडे येत असतांनी मुरमाडी येथिल कुमार पेट्रोलपंप समोरील चौकात एनएच. ०६ रोडवर भंडाराकडुन लाखनीकडे येणाऱ्या आरोपी चालकाने आपले ताब्यातील वाहन हयगयीने निष्काळजीपने चालवुन जखमीचे सायकला घडक देवुन फिर्यादीस व मागे बसनाऱ्या मित्रास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोस्टे. लाखनी येथे कलम २७९,३३७ भांदवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. टेंभुर्णे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

६) लग्नामध्ये नाचता-नाचता चक्कर येवुन खाली पडुन बहोश झाल्याने ईसमाचा औषधोपचारा दरम्यान मृत्यु . :–

दिनांक ४/०५/२०१७ चे ११०३० वा दर. यातील मृतक चंद्रशेखर भाऊराव तायडे वय ४५ वर्ष, रा. वसंत नगर नागपुर हा कोद्रर्ली येथे लग्नाकरिता आला असता तेथे लग्नामध्ये नाचता नाचता चक्कर येवुन खाली पडुन बहोश झाल्याने त्यास औषधोपचारा करिता ग्रा. रू. पवनी येथे प्रथमोपचार करून तेथील डॉक्टरने नागपुर येथे रेफर केल्याने त्यास मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पो.स्टे. अजनी नागपुर येथे मर्ग क्र.००/२०१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी मपोना. चिखले यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. राहांगडाले पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**७) अवैध दारु अडयावर धाडी . :–**

दिनांक १७/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे. आंधळगाव व पवनी येथे अवैध दारु अडयावर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ०९ लिटर ९०० मिली लीटर देशी दारू किंमती २,७४०/रु., तसेच जुगारातुन किंमती २५,२३१/रू. असा एकुण किंमती २७,९७१/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहेत.

**८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक १७/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १०५ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०९ तीन सिटर वाहनांवरती ०७ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ८९ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

18-5

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.

18/5